# सावधान! पुढे धोका आहे...........

**आ**य १,निरंत वसाहत,बिबवेवाडी,पुणे या माझ्या घरात माझे तीन श्वान झाले. शेवटचा कॉकरस्पॅनियल जेम्स. त्या आधी बॉक्सर साकी -२ आणि पहिला डॉबरमन साकी -१.

माझ्या पत्नीला टापटीप, स्वच्छतेची प्रचंड आवड. अंगण हा घराचा आरसा असतो असे मनापासून मानत ती स्वतः अंगण आणि ओसरी हातात केरसुणी आणि वेळप्रसंगी ब्रश-साबण घेऊन देखील स्वच्छ ठेवते. माझा स्वभाव त्याच्यापेक्षा अगदी वेगळा. पूर्ण ३६चा आकडा. अंगणात प्राण्यापक्ष्यांच्या पावलांचे ठसे मला रांगोळीपेक्षा जास्त आनंद देतात. घर कसे जिवंत वाटते. माझी ही जीवनशैली माझ्या प्रिय पत्नीला अजिबात आवडत नाही. बगीच्यात पडलेले वाळलेले पान न् पान आणि झाडावरच्या वाळलेल्या काड्या ती नेमाने उचलून केराच्या कुंडीत टाकते. आता आमच्याकडे पाळीव प्राणी नाहीत, पण येणाऱ्या जाणाऱ्या मांजर आणि मुंगुसा-बेडकांच्या विष्ठेच्या वासाने तिचे डोके ती घरात बसली असतानाही भणभणते. शेजाऱ्यांनी टाकलेली 'औषधे' खाऊन काही प्राणी आणि कीटक आमच्या अंगण-ओसरीवर किंवा शेजारच्या बगीच्यात येऊन मरतात. ती कलेवरे बघून ती घरात पळून येते आणि एक खड्डा करून त्यांना मूठमाती द्या आणि मग लिहीत बसा असा आग्रह धरते. अंगातील उष्णता सहन न झाल्याने जे प्राणी उघड्यावर येऊन मरतात, ते तसेच पुरले तर ते स्थान खराब होते हे तिला मान्य नाही.

जनावरांच्या विष्ठेचा वास त्यांच्या प्रकृतीचा द्योतक असतो. तसेच विष्ठेचे विघटन होत असताना येणारे वेगवेगळे वास हे विघटनाच्या क्रिया बरोबर चालली आहे ना, हे सांगतात. बगीच्यात पाणी जास्त कमी झालेले. तेथे पडलेले सर्वच सेंद्रीय पदार्थ ज्या गतीने व ज्या पायऱ्यांनी पुन्हा विलीन होत असतात, त्यावरून त्या स्थानाची शुद्धता आणि निसर्गचक्राची नेमकी कल्पना आपल्याला येते. हे जाणण्यात मला आनंद मिळतो. दोघेही कामावर जात होतो तेव्हा भांड्याला भांडे लागले तरी त्याचा आवाज विरून जात होता. पण आता निवृत्त झाल्यावर सतत एकाच ठिकाणी असल्याने शांतता टिकविण्यासाठी मी खूप आणि ती थोडी वागणूक बदलण्याचा प्रयत्न करीत आहोत. सांगण्याचा मुद्दा हा की श्वान विश्वात उतरावयाचे की नाही ते ठरविताना अर्धांगिनीचा स्वभाव-आवडी-निवडी विचारात घेतल्या नाहीत तर घर उद्‌ध्वस्त झाले नाही तरी ते शांत राहात नाही. तेथे आनंद राहात नाही. म्हणून म्हणतो आहे,सावधान!

माझा मुलगा दिनेश त्यावेळी पाच सहा वर्षांचा असेल. माझा पहिला श्वान डॉबरमन मादी चार एक महिन्यांची असेल. माझे श्वान शिक्षणाचे कौशल्य विकसित झालेले असल्याने किंवा श्वान शिक्षण हा माझ्या स्वभावाचा अविभाज्य घटक झाला असल्याने ती डॉबरमन मला हवे तसे वागली की तिला शाबासकी देणे, तिच्या क्रियांना नावे देणे, ती नावे तिला समजावून देणे व त्या क्रिया घरातल्या प्रत्येकाच्या हुकुमावरून करवून घेणे हे आपोआप व योग्य वेळी होत गेले. त्यामुळे वयाच्या चौथ्या महिन्यात श्वान मादी प्रशिक्षित झालेली होती. त्यावेळी मी स्वतःच्या कौशल्यावर खूष होतो. 'कॅच'असे सांगितल्यावर धरलेला चेंडू सोडायचा नाही आणि अंगाचे पूर्ण वजन टाकून त्या कापडी बाहुल्याला लोळवायचे शिक्षण मी त्या श्वान मादीला दिलेले होते. आमच्या समोरच्या इमारतीत एक बॅनर्जी नावाचे बंगाली कुटुंब राहात होते. त्यांचा मुलगा आमच्या दिनेशपेक्षा थोडा मोठा म्हणजे दीड दोन वर्षांनी मोठा होता. तो ताकदीला मात्र दिनेशला बराचसा वरचढ असावा. दिनेश अगदीच किरकोळ, दुबला पतला होता. एक दिवस त्याचे व दिनेशचे मुलांचे होते तसे भांडण झाले. श्वान मादीची साखळी काढून दिनेश तिली घेऊन थेट बॅनर्जींच्या घरासमोर गेला. आमचे कोणाचे तिकडे लक्ष नव्हते. पण दिनेश श्वान मादीला घेऊन येतो आहे हे पाहताच बॅनर्जींचा मुलगा त्यांच्या घराकडे पळाला. श्वान मादी काय करू शकते ते तो रोजच पाहात असे. त्याच्याकडे बोट दाखवून दिनेशने श्वान मादीला आदेश दिला-कॅच. श्वान मादी त्वेषाने पुढे झेपावली. त्या झटक्याने दिनेशच्या हातातील साखळी सुटली. रस्ता व बॅनर्जींच्या घराच्या दरवाज्यात १५-२० फुटांचे अंतर होते. श्वान आपल्याकडे चाल करून येत आहे हे पाहिल्यावर बॅनर्जींच्या मुलाने घरात धाव घेतली. दार धाडकन लावून घेतले म्हणूनच पुढचा अनवस्था प्रसंग टळला. नाहीतर काय झाले असते त्याची कल्पनाही करवत नाही. त्या प्रसंगाला ३० वर्षे होऊन गेली असली तरी त्या प्रसंगाच्या आठवणीनेही अंगावर काटा उभा राहतो.

श्वानाने मुलावर हल्ला करून मुलाच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याची एक घटना माझ्या पक्की लक्षात आहे. डॉ.वैद्य यांच्या दवाखान्यात मांडीचे हाड मोडल्याने उपचार करून घेण्यास माझी आई तेथे दाखल झालेली होती. एक रुग्णवाहिका तेथे कर्णकर्कश आवाज करीत आली. दवाखान्याच्या दारात उभी राहिली. कुतूहलापोटी सर्वचजण तेथे काय झाले ते पाहण्यास गोळा झाले. एका सात आठ वर्षांच्या मुलास हातात घेऊन तीन चार माणसे घाईघाईने आत आली. एका श्वानाने त्याच्यावर हल्ला केला असे कानावर आल्याने मी त्या घटना बारकाईने समजावून घेतल्या. झाले होते असे की एका बंगल्याच्या आवारात अल्सेशियन श्वान होता. बंगल्याचे फाटक बंद असे. त्याला आतून कडी-कुलूप असे. शाळेत जाताना वात्रट मुले विचित्र आवाज काढून त्याला चिडवत असत. त्यामुळे तो श्वान चिडून भुंकत असे. त्या बंगल्याचा मालकही त्या मुलांवर चिडत असे. श्वान चिडतो, भुंकतो, बंगल्याचा मालकही चिडतो याची मुलांना गम्मत वाटे. ती श्वानाच्या मुद्दाम खोड्या काढत आणि मालक येताना पाहून पळून जात. नेहमीप्रमाणे त्याही दिवशी वात्रट मुले श्वानाला चिडवू लागली. ती फाटक वाजवू लागली. योगायोगाने त्या दिवशी फाटकाला कुलूप लावलेले नव्हते. कोणीतरी दाराची कडी काढली आणि श्वानाने पळू लागलेल्या मुलाच्या मानेचा चावा घेतला. आमचा मुलगा त्यातील नाही हो असे त्या मुलाच्या घरचे म्हणाले तरी घडायचे ते घडून गेले होते. तो मुलगा दोषी असेल वा त्या वेळी त्या श्वानाला पळताना नजरेस पडला असेल, त्या मुलाला त्याची किंमत मोजावी लागली.

माणसावर हल्ला करण्यास शिकविलेला श्वान गोळ्या भरलेल्या पिस्तुलासारखा असतो. ज्या घरात लहान, समज नसणारी मुले असतील त्यांनी आपल्या श्वानाला माणसावर हल्ला करण्याचे शिकवू नये. तसे शिकविलेच तर मग तो श्वान कुलुपात ठेवायची व्यवस्था करावी. म्हणून या अक्षर अक्षता तुमच्या डोक्यावर ठेवून मी सांगेन, सा व धा न!

रस्त्यावरून जाणाऱ्या वात्रट मुलांची ही कथा, तर रोज सकाळी फिरायला जाताना बंगल्याच्या आवारातील रस्त्यालगतची फुले राजरोसपणे काढणारे, देवाला नेतो आहे अशी शिरजोरी करणारे शिक्षित -अर्धशिक्षित 'चोर' यांची दुसरीच कथा. तारेच्या कुंपणातून हात घालून फुले काढताना अशा एका चोराचा हात एका श्वानाने पकडला. झटापटीत हात रक्तबंबाळ झाला. त्यानंतर तो श्वान बंगल्याच्या आवारात काही तरी खाल्ल्याने मेलेला आढळला.

श्वानाने बंगल्याबाहेर जाऊन हल्ला केला किंवा फुले चोराचा हात पकडला. या दोन्ही घटनांत श्वानाचा मालक हा दखलपात्र गुन्हा करणारा ठरतो. कारण माणसांनी केलेल्या नियमाप्रमाणे प्राणी पाळला तर त्यापासून माणसांना इजा होणार नाही याची काळजी प्राणी पाळणाऱ्याने घ्यायची असते. म्हणून श्वान पाळणाऱ्या आमच्या मित्राने तारेच्या कुंपणाच्या वर बारीक जाळी बसवून फुले काढणारे हात आत येणार नाहीत अशी काळजी घेतली आहे.

शाळेच्या रस्त्यालगतच्या श्वान मालकांनी शाळेच्या वेळेआधी श्वान मुलांच्या नजरेस पडणार नाही अशी काळजी घ्यावी. कारण माणूस विरुध्द प्राणी असा प्रसंग येतो तेव्हा माणसे माणसांचीच बाजू घेतात. दोषी कोण ते पाहिले जात नाही. माणसांनी केलेले कायदेही माणसांच्याच बाजूचे आहेत. या अक्षर अक्षता तुमच्या शिरावर ठेवून मी म्हणेन,सा व धा न !

तुम्ही श्वान पालनात उतरलात की केनेल क्लबचे सदस्यत्व घेण्याची तुम्हाला इच्छा होणे अगदी स्वाभाविक आहे. ते भरवत असलेल्या श्वान प्रदर्शनांमुळे केनेल क्लब लोकांच्या नजरेत येतो. जेथे अनेक श्वानप्रेमी जमतात तेथे आपण आपोआपच ओढले जातो. माझ्या 'संरक्षक सोबती' या पहिल्या पुस्तकाची प्रस्तावना लिहिणाऱ्या श्री.ल.ग.देशपांडे सरांनी मला वेळोवेळी सावध केले नसते तर मी देखील केनेल क्लबचा सभासद झालो असतो आणि तेथे दुखावला गेलो असतो. केनेल क्लब हाही क्लब संस्कृतीप्रमाणे पैसेवाल्यांसाठीच आहे. 'सर्वे गुणाः कांचनम् आश्रयंते' या संस्कृत उक्तीप्रमामे पैसा खुळखुळू लागला की आपण समाजात जेथे जाऊ तेथे श्रेष्ठच राहू अशी ऊर्मी माणसाच्या मनात येतेच. श्वान क्षेत्रही त्याला अपवाद नाही. जेथे जाऊ तेथे श्रेष्ठच राहू ही इच्छा लक्ष्मी आणि सरस्वतीचे वैर बरोबर घेऊनच येते. एकाचा जय म्हणजे दुसऱ्याचा पराजय. अत्युच्च स्थानी पोहोचलेल्या माणसालाही एक दिवस शेरास सव्वा शेर भेटतोच. उच्च पदासाठी धडपडणाऱ्या या गर्दीत आपण जाऊ नये म्हणून आपण आपल्या स्थानी मजबूत असायला हवे. 'जे जे आपणासि ठावे ते ते इतरांना सांगावे,' या व 'शिष्यात् इच्छेत् पराजयम्' या वचनांप्रमाणे आपण ज्याला सांगितले तो आपल्याही पुढे गेला याचा

मनस्वी आनंद घेण्याची मानसिकता घेऊन वावरलो तर आपल्याला चढाओढीचा त्रास कधीही होत नाही. म्हणून या अक्षररूपी अक्षता तुमच्या शिरावर टाकून एवढेच म्हणतो, सा व धा न.

पैदासकाराच्या व्यवसायात जेवढे धोके आहेत तेवढे इतके कोठेही नसतील. सर्वात मोठा थोका प्रतिस्पर्ध्याचा. पैदाशीसाठी चांगला नर श्वान मिळणे ही एक भाग्याचीच गोष्ट आहे. असा नर मिळवून त्या नरापासून आपल्या मादीला पिले देणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. अशा वेळी प्रतिस्पर्ध्याला चांगला नर देतो असे सांगून मादी आपल्याकडे ठेवून घेऊन तिला दुसराच नर लावणे हा एक नेहमीचा फसविण्याचा मार्ग असतो. यावरचा उपाय म्हणजे नरमादीचा लाग प्रत्यक्षात लागला असतानाचा फोटो काढून मागणे. माझ्या माहितीतील काही श्वान पैदासकार असा उपाय योजतात. पुण्याचे श्री.अभ्यंकर यांनी तर तसा परिपाठच केलेला आहे. याशिवाय होणारा धोका म्हणजे श्वानाला फिरायला नेणाऱ्या नोकराला फितवून आपली मादी त्या नरापासून फलित करून घेणे. यावरील उपाय म्हणजे नराचा मालक व मादीचा मालक दोघांनीही प्रत्यक्ष लाग लागलेला असताना तेथे हजर राहून तो प्रसंग लिहून ठेवणे. दुसऱ्याचा नर मालकाच्या इच्छेविरुध्द वापरण्याचा दुसरा उपाय म्हणजे नर जेथे व्यायामासाठी मोकळा सोडला जातो तेते आपली मादी ठेवणे. चंद्रपूरला कुष्ठरोग्यांसाठी उपचार केंद्र व वसाहत चालविणाऱ्या श्री.बाबा आमटे यांनी हा उपाय वापरल्याचे त्यांनी मला सांगितले. ते त्यांच्याच शब्दात सांगतो. पुण्याच्या 'मिस कामा, हे श्वान क्षेत्रातील एक बडे धेंड होते.त्यांच्याकडे लंडनहून आणलेले एअरडेल जातीचे श्वान होते. पण आपला श्वान दुसऱ्या कोणाकडे जाऊ नये हे त्या फार कटाक्षाने पहात. बाबा आमट्यांना त्यांच्याकडे असलेल्या एअरडेलच्या मादीसाठी कामांचा नर हवा होता. मादाम कामा त्यांच्या श्वानाला रोज व्यायामासाठी घेऊन जात हे बाबांनी पाहिले होते. बाबांची मादी हीटवर आल्यावर त्यांनी तिला मादाम कामा त्यांच्या श्वानाला रोज नेत त्या मार्गावर झुडुपात नेऊन बांधले. मादामचा श्वान तेथून जाताना त्याला त्या मादीचा वास आला. त्याने तिला गाठले. बाबांचा हेतू साध्य झाला. परत ते नामानिराळे राहू शकले.

श्वानाच्या वागणुकीवर त्याच्या न कळत त्याच्या पालकांची छाप पडत असते. खास करून पालक खरोखरच श्वानप्रेमी असतील तर हे जास्तच प्रभावीपणे दिसते. माझे हे निरीक्षण स्पष्ट करण्यासाठी गेली अनेक वर्षे मी ज्यांना ओळखतो अशा एका कुटुंबाचे उदाहरण मी येथे देणार आहे.

इन मीन तीन माणसांचे हे कुटुंब रंगारूपाने गोरे गोमटे. एकुलत्या एका मुलीची सर्व हौस वडील पुरवत होते. मुलीला पशू-पध्यांचे खूपच प्रेम. मुलीच्या हौसेखातर वडिलांनी गेल्या सात आठ वर्षांत चार श्वान आणले. त्यातले पहिले तीन चिडखोर, हल्लेखोर निघाले. जाणाऱ्या, येणाऱ्यांवर ते चवताळून हल्ला करत. त्यांना घराच्या कुंपणाला कुलूप लावावे लागे, कारण पहिल्या श्वानाने चुकून दार उघडे राहिले तर बाहेर पडून कॉलनीतील ऑफिसमध्ये काम करणाऱ्या तरुणावर हल्ला केला. बोलाचाली होण्याआधीच त्यांनी तो श्वान तातडीने कोणाला तरी देऊन टाकला.

महिना पंधरा दिवसांनी त्यांनी एक नवे पिल्लू आणले. तेही असेच हल्लेखोर निघाले. काही अपघात होण्याआधीच त्यांनी त्याची बोळवण केली. नंतर आता तिसरे पिल्लू आणले. त्यावेळी एक मादी श्वान आणली होती. दीड दोन वर्षांत ती मादी देखील येणाऱ्या जाणाऱ्यावर त्वेषाने भुंकू लागली. पुन्हा त्यांनी त्या मादीचीही बोळवण केली. त्यानंतर चौथे पिल्लू आणले.

येथे काही गोष्टी सांगणे आवश्यक आहे. त्या कुटुंबाचा बंगला कॉलनीच्या कोपऱ्यावर, जेथे कॉलनीचा रस्ता हमरस्त्याला मिळतो तेथे आहे. येणाऱ्या, खास करून जाणाऱ्या प्रत्येकाला तेथे थबकून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांचा अंदाज घेऊनच पुढे निघावे लागते. या कुटुंबाने पहिला अल्सेशियन श्वान आणला होता. त्यावेळी त्यांची कन्या सातवी आठवीत असेल. शाळेतील अभ्यासापेक्षा तिचे नाटकात जास्त लक्ष होते. वयात आलेल्या एकुलत्या एका मुलीच्या बापाला साजेशी त्यांची वागणूक होती. पण त्याचा परिणाम त्यांच्या श्वानावर नकळत होत होता. कोपऱ्यावर कोणत्याही कारणाने थबकलेल्या वा थांबलेल्या, वाहन सावकाश झालेल्या प्रत्येकावर हा श्वान कुंपणाच्या आडून भुंकू लागला. त्यामुळे लोक कुंपणापासून दूर चालू लागले. खास करून मोटार सायकलवरून जाणाऱ्या तरुणांवर तो फारच चवताळून भुंकत असे. पुढे तर ते लोक बंगल्याची हद्द ओलांडेपर्यंत त्याच्यावर भुंकत राही. दिवसभर असा आरडाओरडा केल्यावर तो रात्री डाराडूर झोपत असे.

अशाच एका तरुणावर त्याने एक दिवस दार उघडे मिळाल्यावर बाहेर येऊन एकदम झडप घातली. मी पहिल्यांदा सांगितलेला तो हाच प्रसंग. त्यांचा दुसरा श्वान देशी होता. त्यावेळी त्यांची कन्या दिल्लीच्या ड्रामा स्कूलमध्ये जाण्याच्या गोष्टी करत होती. दुसरा श्वान देखील हल्ला करू लागला. तेव्हा सुरुवातीला सांगितल्या प्रमाणे त्यांनी तिसरा श्वान -एक मादी आणली. ती देखील आधीच्या श्वानाप्रमाणे वागू लागली. म्हणून तिची बोळवण करून त्यांनी चौथे पिल्लू आणले. या वेळी मुख्य बदल झाला म्हणजे त्या मुलीचे लग्न ठरले. हे श्वान पिल्लू तीन चार महिन्यांचे असतानाच त्या मुलीचे लग्न झाले. जादूची कांडी फिरावी तसे हे चौथे श्वान सर्वांशी खेळीमेळीने वागताना दिसले. त्या घरातले पिताजी देखील दरवाज्यावर हात ठेवून जाणाऱ्या येणाऱ्यांशी गप्पागोष्टी करू लागले. हा चौथा श्वान खेळकर कसा असा प्रश्न तुम्हाला पडला असेल तर हे प्रकरण पुन्हा एकदा पहिल्यापासून वाचायला घ्या किंवा तुम्ही पिता नसाल तर पिता झाल्यावर हे प्रकरण पुन्हा वाचा एवढेच मी सांगेन.

कॉलनीच्या दाराशी असलेल्या घराच्या उदाहरणाच्या नेमकी उलट आमच्या अरुण बापट याची कथा आहे. बापटचे घर आहे कॉलनीच्या रस्त्याच्या शेवटच्या टोकाला. पुढे रस्ता बंद! त्यामुळे तेथपर्यंत येणारे लोक एक तर त्यांच्याकडे तरी येत असतात किंवा समोरच्या गाजरे साहेबांकडे. श्री.गाजरे देखील श्वान शौकीन. त्यांच्याकडे कारवान श्वान होता. आमच्या अरुण बापटकडे गेल्या सात आठ वर्षांत चार श्वान झाले. अरुणला ज्योतिषात बऱ्यापैकी गती आहे. त्याच्याकडे भविष्य जाणून घेणाऱ्यांची रीघ असते. संध्याकाळी चार ते आठ ही त्याची लोकांना मार्गदर्शन करण्याची वेळ. कुंडली पाहून मार्गदर्शन घेण्यासाठी ते कोणाकडूनही काहीही घेत नाहीत. नमस्कारही नाही. उलट आलेल्यांचा आदरसत्कार करून प्रत्येकाच्या हाती खाऊची वाटी किंवा चहाचा कप देण्याचा त्यांचा परिपाठ आहे.

बंगल्याचे फाटक उघडे असतानाही त्यांचे श्वान या वेळात घराबाहेर जात नाहीत. आलेल्यांपैकी पुन्हा येणाऱ्यांच्या जवळ जाऊन त्यांना शेपूट हलवून ओळख देणे हा त्या श्वानांचा परिपाठ. बापटांचे श्वान त्यांच्या बंगल्याच्या पोर्चमध्ये घुटमळत असतात. घरात जायला त्यांना मनाई असली तरी माझ्या सारखा श्वानप्रेमी आला तर आमचे ‘शेपूट’ होऊन ते आत येतात. श्वानाचे हे आदरातिथ्य दिवस मावळताच अस्ताला जाते. सहा सातच्या सुमारास शेवटचा गृहस्थ बाहेर पडला आणि अरुण गादीवरून खाली उतला की कोणीही आलेले त्यांना व त्यांच्या श्वानालाही आवडत नाही. कोणाची चाहूल लागताच श्वानाच्या पाठीचे केस ताठ होतात. आलेल्या व्यक्तीचा त्यांच्या फाटकाकडे रोख असला किंवा त्यांच्या फाटकाकडे कोणी आपला मोर्चा वळवला की तो भुंकू लागतो. आलेली व्यक्तीही ‘भीक नको,पण कुत्रा आवर’ म्हणत परत जाते किंवा फारच गरज असेल तर गाजरेंच्या घरासमोर उभे राहून बापट यांना साद घालते.

बापटांचे हे उदाहरण या प्रकरणात घालण्याचे आणखी एक कारण आहे. मालकाच्या स्वभावाची छाप श्वानावर पडण्याचे हे उत्तम उदाहरण आहेच, पण त्याहीपेक्षा जास्त म्हणजे त्यांच्या येथे होणारी एक विचित्र गोष्ट म्हणजे बापटांकडे आतापर्यंत असलेले चारही श्वान एक दिवस अचानक घरातून निघून जातात. ते नंतर कधीही परत येत नाहीत. त्या श्वानांबद्दल काही बातमीही त्यांना कधी समजत नाही.

पाळलेला श्वान हरवणे-घरातून गायब होणे ही नित्याची नसली तरी अनपेक्षित, त्यामुळे धक्कादायक बाब वाटू शकते म्हणून सा व धा न!

घराच्या राखणीसाठी एखादा श्वान पाळण्याआधी तुम्ही हे वाचत असाल किंवा राखणीसाठी एक श्वान बाळगल्यावर तुम्ही हे वाचत असाल तर तुम्हाला एका गोष्टीची जाणीव करून घ्यायलाच हवी. तुम्ही हे कधीही विसरता कामा नये की श्वान हा एक तुमच्या माझ्या सारखाच सजीव प्राणी आहे. सजीव प्राण्याचे सर्व मानसिक, शारीरिक व्यवहार त्यालाही असतात. त्याच्या कर्तव्याच्या आड येणारी सर्वात मोठी शारीरिक प्रक्रिया म्हणजे त्याची झोप.

आपल्याला जशी हलकी वा गाढ झोप असते तशीच श्वानांनाही हलकी व गाढ झोप असते. झोप हलकी व गाढ लागणे हे ती व्यक्ती मनाने वा शरीराने किती थकलेली आहे यावर अवलंबून असते. शरीराला व मनाला दोहोंनाही झोपेची आवश्यकता असते. एखादे वेळी शरीराला झोपेची आवश्यकता असते व मनाला नसते. तेव्हा आपल्याला झोपेत पडतात तशी स्वप्ने श्वानांनाही पडतात. स्वप्ने पडताना माणसांच्या जशा शारीरिक हालचाली होतात, ती अनेकदा दचकून उठतात,

तशा हालचाली श्वानही करतात वा दचकून उठतात. तुमचे झोपलेल्या श्वानाकडे लक्ष असेल तर त्याला पडणाऱ्या स्वप्नांमुळे होणाऱ्या चालण्याच्या, पळण्याच्या, दात विचकण्याच्या एवढेच नाही, तर भुंकण्याच्याही हालचाली तुमच्या लक्षात येतात. श्वानांना देखील झोप अनावर होते आणि अगदी थोड्या वेळाची गाढ झोपेची डुलकी त्यांनाही अगदी दिवसा किंवा एरवी त्यांच्या जाग्या राहण्याच्या वेळात देखील येऊ शकते. त्याहून धोकादायक प्रकार असतो दिवा स्वप्न पाहण्याचा. मोठी, अवजड शरीरे असलेल्या ग्रेट डेनसारख्या श्वानात ही परिस्थिती निर्माण होण्याचा धोका खूप जास्त असतो असे मला ग्रेट डेनचे पैदासकार श्री.मुकुंदराव ओगले यांनी सांगितले होते.

श्री.मुकुंदराव ओगले यांच्या मते पिलाची वाढ होत असताना त्याला काही सवयी लावायला हव्यात. पिलू जागे झाले की त्याला शारीरिक हालचाली करण्यास भाग पाडणे आवश्यक असते. तो जागा असताना त्याच्याकडे जाऊन त्याला वरचेवर उठायला, चालायला, पळायला लावले नाही तर त्याला पडल्या पडल्या दिवास्वप्ने पाहण्याची सवय लागू शकते. दिवास्वप्ने पाहणारे श्वान प्रत्यक्ष हालचाल न करता मनातल्या मनातच उठतात, चालतात, खेळतात. त्यांचे शरीर मात्र तसेच पडून असते. त्यामुळे मनाचा व शरीराचा संबंध तुटतो. मनाने ठरवले तरी ते शरीराला समजून स्नायूंची हालचाल करून प्रत्यक्षात उठणे त्यांना जड जाते. सांधेदुखीने ग्रस्त असलेल्या माणसांसारख्या हालचाली करताना त्यांना खूप त्रास होतो. म्हणून श्वानांना दिवास्वप्ने पाहण्याची सवय लागू नये यासाठी खास करून त्यांच्या पौगंड व किशोरावस्थेत म्हणजे सुमारे तीन ते सात महिने या वयात जातीप्रमाणे श्वानांवर देखरेख ठेवणाऱ्याने विशेष जागरुक राहावे लागते.

पौगंडावस्था वा किशोरावस्थेचा काल श्वानाच्या आकारमानावर अवलंबून असतो. लहान आकाराच्या, खेळणेवजा श्वानात हा काळ दोन महिने ते तीन महिने असतो. चुहाउवा, पोमेरियन सारख्या जाती यात येतात. मध्यम आकाराचे श्वान, ज्यात लॅब्रॅडॉर, अल्सेशियनसारख्या जाती येतात, त्यात हे वय तीन ते पाच महिने असते. ग्रेट डेन, सेंट बर्नार्ड सारख्या मोठ्या आकाराच्या जातींत हे वय चार ते सात महिने असते. या वयांत श्वानकुळांप्रमाणे थोडा फार फरक पडू शकतो. काही श्वानकुळे लवकर परिपक्व होतात, तर काही श्वानकुळे धीम्या गतीने परिपक्व होणारी असतात. अशा श्वानांना स्लो मॅच्युअरिंग डॉग्ज असे संबोधिले जाते. या श्वानांची शरीराप्रमाणे मनाने मोठे होण्याची गतीही धीमी असते. आकाराने वाढले तरी त्यांचा मूलपणा जात नाही. ते सर्वांशीच दोस्ती करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना त्यांच्या शारीरिक बळाची कल्पना येत नाही. या वयात माणसांच्या मुलांसारखीच त्यांची परिस्थिती असते. त्यांच्याशी वागताना आपल्यालाही आपल्या मुलांसारखेच त्यांच्याशी वागावे लागते. पिलू वाढत असताना त्याच्या शरीराच्या वाढीचा ताण त्याच्यावर खूप जास्त असतो. त्याच्या मानसिक गरजाही खूप कमी असतात. अशा वेळी ते खूप झोपते. अगदी गाढ झोपते. झोपेतून उठले की त्याला लघवीला जावे लागते.

तुम्ही पाळण्यासाठी ज्या वयाचे श्वान आणता म्हणजे पाच ते दहा आठवड्याच्या श्वानात आपले अंथरुण म्हणजे झोपायची जागा ओली करायची नाही याची जाणीव झालेली असते. त्यामुळे झोपेतून उठल्या उठल्या थोडे चालत जाऊनच ते लघवी करते. झोपेतून उठल्याबरोबर चालू लागणे ही त्याची स्वाभाविक शरीर प्रकृती बनलेली असते. शरीरधर्म, लघवी, शौच इ.क्रिया करून झाल्यावर श्वान झोपेतच जागे होण्याचा प्रयत्न करतात. अजून झोप पूर्ण उतरलेली नाही असे आपण आपल्या मुलांच्या बाबतीत म्हणतो तशीच ही अवस्था. या अवस्थेत त्यांच्या प्रक्रियेत आपण ढवळाढवळ करू नये. काही श्वानांत हा झोप उतरण्याचा काळ अधिक असू शकतो. पण झोप उतरल्या उतरल्या त्यांना इतरांशी संपर्क करण्याची स्वाभाविक इच्छा असते. ती पूर्ण करणे म्हणजे त्यांच्याशी बोलणे, खेळणे, त्यांना हालचाल करण्यास प्रोत्साहन देणे हे आवश्यक असते.

झोप उतरल्या उतरल्या आपण जर त्यांना प्रतिसाद दिला तर ते आपले दोस्त होतात. लहान मुलांना उठल्या उठल्या त्यांची आई वा आजी लागते तशीच अवस्था या श्वान पिलांचीही असते. मुलाचे जे नाते आजन्म आईशी जडलेले असते तसेच श्वान पिलांचे व पालकांचेही जोडले जाऊ शकते. त्यासाठी श्वान पिलांची झोप उतरताना पालकांनी त्यांच्या जवळ असणे व त्यांना प्रतिसाद देणे ही अत्यावश्यक बाब आहे. झोप उतरताना वा उतरल्यावर जर प्रतिसाद मिळाला नाही तर पिलाला दिवास्वप्ने पाहण्याची सवय लागते. पिलाचे वय वाढते तसतशी ही गरज वाढते व नंतर हळू हळू कमी होते. त्याचा तो राहू लागतो. सभोवतालच्या गोष्टींत रस घेऊ लागतो. पण त्याच्या अतिसंवेदनशील वयात बालपण ते

पौगंडावस्था-किशोरावस्था या काळात पालकाला जागृत राहून त्याला दिवास्वप्न बघण्याची सवय लागणार नाही याची खबरदारी घ्यावीच लागते. खास करून मोठ्या आकाराच्या जातींत हा प्रश्न येऊ शकतो. त्यांच्या वाढलेल्या वजनामुळे लहान चणीच्या श्वानापेक्षा जास्त शक्ती हालचाल करण्यासाठी वापरावी लागत असल्याने मन व स्नायू यांचा संबंध दृढ करून मन ते स्नायू असा विचाराचा वेग वाढवत न्यावा लागतो. आपण प्रयत्न करून हा वेग वाढवत नेऊ शकतो.

श्वान जेव्हा त्याच्या सजातीयांच्या समुदायात वाढत असतो तेव्हा हा वेग वाढविण्याचे काम त्यांचे समवयीन बांधव करत असतात. खेळताना हुलकावण्या देणे, धावायला सुरुवात करणे, उंच व लांब उड्या मारणे, तोंडाने पकडणे वा सोडणे, वस्तू पकडताना आवश्यक तेवढ्यात दाब देणे या प्रक्रिया त्यांच्या अंगवळणी पडत जातात. कारण इतर श्वान बांधवांच्या प्रतिक्रियांची जाणीव त्यांना लवकर होते. माणसांच्या भाषेपेक्षा श्वानांची भाषा त्यांना लवकर समजते.

जी श्वान पिले केवळ माणसांच्या सहवासात वाढतात, त्यांना त्यांच्या ताकदीची जाणीव होत नाही. खास करून जबड्यात दाताखाली एखादी गोष्ट धरली तर किती दाब जबड्याच्या स्नायूंनी दिला तरी दातांचे व्रण त्या गोष्टीवर उठणार नाहीत हा अंदाज केवळ माणसांच्या संगतीत वाढलेल्या श्वानांपेक्षा श्वान संगतीत वाढलेल्या पिलांच्या बाबतीत उत्तम रित्या वाढलेला दिसतो. त्यामुळे दात लावण्याचा हा दोष म्हणजे दातांनी वाजवीपेक्षा जास्त दाब देण्याची सवय केवळ माणसांच्या संगतीत वाढलेल्या श्वानात जास्त प्रमाणात आढळण्याची शक्यता असते.

राखणीसाठी श्वान ठेवत असताना त्याचे लक्ष व हालचाल वेगवान असण्याची आवश्यकता असते. कोणतीही हालचाल अथवा आवाज त्याच्या चटकन लक्षात यायला हवा. ही गोष्ट लक्षात आल्यावर त्यावर भुंकणे, समोर जाऊन नेमके काय आहे ते बघणे इत्यादी क्रिया त्याने जाणीवपूर्वक, ताबडतोब करायला हव्यात. त्यासाठी आपले श्वान श्वानसंगतीत पाठवणे शक्य नसेल तेव्हा पालकाने या गोष्टी जाणीवपूर्वक करून घ्यायला हव्यात. दिवास्वप्ने पाहणे ही टोकाची वागणूक झाली. पण धीमी हालचाल, सावकाश प्रतिक्रिया ही उणीव अनेक श्वानांत आढळते. ती देखील टाळून ती वेगवान अपेक्षित प्रतिक्रिया देण्याची सवय पिलांना लावायलाच हवी. दिवास्वप्न बघणारा श्वान किंवा गाढ झोपेत असणारा श्वान यांना सभोवतालचे भान राहात नाही. अशा श्वानांच्या हजेरीत तो श्वान तेथे असतानाही परक्या व्यक्ती दरवाजा लोटून आत येऊ शकतात व त्यांचा हेतू साध्य करू शकतात. म्हणून सा व धा न!